सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १८० | सोमवार, दि. २३ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन





श्री. प्रसाद शर्मा
अमळनेर



श्री. राजू महाजन
अमळनेर



श्री. रोनक जैन
अमळनेर



श्री. संजय भिला पाटील
पहिलवान



श्री. गुणवंत पाटील
सामाजिक कार्यकर्ते

# गलवाडे रोडवर वारंवार अपघात होणे सुरूच!

## मुदतीत गतिरोधकाचे काम न झाल्यास आंदोलन; दाजीबानगरवासीयांचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील गलवाडे रोड परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार रस्ता अपघात होत आहे. मात्र, संबंधित रस्ता दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्षच होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, दाजीबानगरमधील रहिवाशांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

दाजीबानगरातील रहिवासी शोभा जयवंतराव पाटील यांना १५ मार्च २०२६ रोजी अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली. गेल्या



काही महिन्यांत या रस्त्यावर झालेल्या अपघातांमध्ये पाच नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. यासंदर्भात या परिसरातील रहिवाशांनी संबंधित प्रशासनाला वारंवार निवेदन देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर दि. १८ मार्च रोजी दाजीबानगर व परिसरातील महिलांनी अमळनेर येथील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनात नेहा परदेशी, तृप्ती डाके, योजना पाटील, सरला पाटील, सुरेखा पाटील, संगीता सोनार, सुशीला पाटील, कविता पाटील, सरिता पाटील, निर्मलाबाई, मनीषा पाटील, संगीता कापडणे, सुमेरसिंग पाटील आदींसह मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी उपअभियंता पी. ए. पाटील यांनी संबंधित कंत्राटदाराशी संपर्क साधून मंगळवार, २४ मार्चपर्यंत गलवाडे रोडवर आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसविण्याचे आश्वासन दिले. मात्र दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास रस्ता खोदून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.





अमळनेर : रमजान ईदनिमित्त शनिवारी नमाज अदा करताना मुस्लीम बांधव.दुसऱ्या छायाचित्रात मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश शिंदे आदी.





अमळनेर : गुढीपाडव्याच्या सणानंतर आता निसर्गातील बदल सर्वत्र चांगलाच जाणवू लागला आहे. त्या अनुषंगाने तापमानातील वाढीमुळे व्याकुळ झालेले जंगलातील माकडे अन्न-पाण्याच्या शोधात गाव परिसरात येऊ लागले आहेत. रविवारी दुपारी बाराच्या सुमारास तालुक्यातील शिरूड येथे अंगणात ठेवलेल्या टपातील पाण्यावर आपली तहान भागविताना माकड.

(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

रमजान ईद

# अमळनेरमध्ये संयम, आत्मशुद्धी आणि मानवतेचा उत्सव साजरा

## नमाज पठणानंतर करण्यात आली अमन, शांती व भाईचाऱ्याची प्रार्थना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रमजान ईद म्हणजे ईद-उल-फित्र, मुस्लीम धर्मातील अत्यंत पवित्र आणि आनंददायी सण. हा सण केवळ उपवास संपल्याचा आनंद व्यक्त करण्यापुरता मर्यादित नसून तो आत्मसंयम, त्याग, कृतज्ञता आणि सामाजिक समतेचा संदेश देणारा आहे. महिनाभर केलेल्या उपवासानंतर येणारा हा दिवस प्रत्येक मुस्लीम बांधवांसाठी आध्यात्मिक समाधान, आत्मिक शांती आणि नव्या उमेदीचा क्षण ठरतो.

मुस्लीम दिनदर्शिकेनुसार रमजान ईद सण शनिवार, दि. २१ मार्च रोजी शहरात मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. शहरात अमन, शांती आणि भाईचारा वृद्धिंगत व्हावा या भावनेने गांधलीपुरा येथील ईदगाह मैदानावर मुस्लीम बांधवांकडून सामूहिक नमाज अदा करण्यात आली. ईदचे चंद्रदर्शन झाल्यानंतर शनिवारी सकाळी ८ वाजता हाफिज अजहर नूरी यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो मुस्लीम बांधवांनी नमाज अदा केली. नमाजानंतर सर्वांनी अल्लाहकडे देशात कायम अमन, शांती आणि सौहार्द नांदावे यासाठी प्रार्थना केली. नमाजपठणानंतर नागरिकांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश शिंदे तसेच पत्रकार जितेंद्र ठाकूर, नगरसेवक साहेबराव पवार, पंकज चौधरी, सामाजिक कार्यकर्ते राजू संदानशिव, कैलास पाटील, श्रीराम चौधरी, गुलाब पाटील, दीपक चौगुले, बाळासाहेब संदानशिव, नाना धनगर, भरत पवार, भागवत सूर्यवंशी, काँग्रेसचे नेते संदीप घोरपडे, भागवत पाटील आदी याप्रसंगी उपस्थित होते.

नमाजपठणानंतर अनेक जणांनी कब्रस्तानात जाऊन आपल्या पूर्वजांच्या आत्म्यासाठी दुआ केली. शहरभर ईदच्या आनंदात एकता आणि प्रेमाचे वातावरण दिसून आले. विविध भागांत लहान मुले एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देताना दिसले. हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक म्हणून सर्वांनी एकत्र येत शीरखुर्म्याचा आस्वाद घेत एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# श्रीराम नवमीनिमित्त २६ मार्चला मिरवणूक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीराम नवमीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी सार्वजनिक श्रीराम नवमी उत्सव समितीची नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत यंदाच्या श्रीराम नवमी उत्सवानिमित्ताने २६ मार्च रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य मिरवणूक काढण्यात येणार आाहे. या मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांचा गजर, आदिवासी नृत्याचे आकर्षक सादरीकरण, लहान मुलांचे कला-कौशल्याचे कार्यक्रम तसेच वारकरी संप्रदायातील टाळ-मृदंगाच्या गजरात भजन-कीर्तन असे विविध कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे यंदाची श्रीराम नवमी मिरवणूक उत्साहपूर्ण होणार असल्याची माहिती समितीच्या सदस्यांनी दिली. या मिरवणुकीत विविध मंडळे, धार्मिक संस्था आणि भाविकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग अपेक्षित आहे. विविध कार्यक्रमांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन मिरवणुकीची शोभा वाढवावी, असे आवाहन सार्वजनिक श्रीराम नवमी उत्सव समितीने केले आहे.

## दिनविशेष
२३ मार्च

- जागतिक हवामान दिवस
- शहीद दिवस
- भारतीय क्रांतिकारी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली.
- क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि अभिनेत्री सुलोचना यांना पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# उन्हाळ्यातील पारंपरिक पाणपोईचा गारवा हरवला

## अमळनेरसह परिसरात फोफावली बाटलीबंद संस्कृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एकेकाळी उन्हाळ्याची चाहूल लागताच शहरातील चौक, बसस्थानके, बाजारपेठा तसेच गावागावांच्या प्रमुख वेशींवर पाणपोई उभारल्या जात होत्या. प्रवाशांची तहान भागवणे हे समाजाचे कर्तव्य मानले जात होते. व्यापारी, सामाजिक संस्था, धर्मादाय मंडळी आणि दानशूर नागरिक पुढाकार घेत थंड व स्वच्छ पाण्याची व्यवस्था करत होते. मात्र, बदलत्या जीवनशैलीसोबत वाढलेल्या 'बाटलीबंद संस्कृती'मुळे ही परंपरा आता हळूहळू लयाला जात असल्याचे चित्र दिसत आहे. पूर्वी उन्हाळ्यात मोठे माठ, टाक्या किंवा फिल्टरच्या माध्यमातून प्रवाशांना मोफत पाणी दिले जात होते. मात्र, आज सार्वजनिक ठिकाणी पाणपोई दिसण्याऐवजी प्लास्टिकचे जार, बाटल्यांचे स्टॉल अधिक दिसू लागले आहेत. त्यामुळे तहान भागवण्यासाठी लोकांना खिशाला झळ सोसावी लागत आहे.



### दानशूर परंपरेला उतरती कळा

सर्वसामान्यांसाठी पाणी ही आज 'खरेदीची वस्तू' बाब झाली आहे. पूर्वी एखाद्या संस्थेच्या नावाने उभारलेली पाणपोई ही केवळ पाण्याची सोय नव्हती, तर सामाजिक बांधिलकीचे जिवंत प्रतीक होते. रमजान, यात्रोत्सव, आषाढी वारी, गणेशोत्सव यांसारख्या धार्मिक व सांस्कृतिक प्रसंगी मोठ्या प्रमाणावर मोफत पाणी वाटप केले जात होते. त्या पाणपोईभोवती माणुसकीचा गारवा अनुभवायला मिळत असे. मात्र, बाटलीबंद पाण्याच्या वाढत्या वापरामुळे आणि बदलत्या सामाजिक सवयींमुळे ही दानशूरतेची परंपरा मागे पडत आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पुन्हा एकदा शहरात आणि गावागावांत पाणपोई उभारण्याची गरज असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## गळफास लावून महिलेची आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील गलवाडे बुद्रुक शिवारात ३८ वर्षीय शेतमजूर महिलेने गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना २१ मार्च रोजी दुपारी उघडकीस आली आहे. मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील अनिता मांगीलाल पावरा (वय ३८) ही कुटुंबीयासमवेत गलवाडे बुद्रुक येथील प्रवीण साहेबराव मिस्त्री यांच्या शेतात मजुरीसह सालदारकीही करत होती. २१ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास तिने शेतातच कडुनिंबाच्या झाडाला साडीने गळफास घेतल्याचे उघडकीस आले. यावेळी उपस्थितांनी साडी कापून तिला खाली उतरविले. त्यानंतर अमळनेर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेचा मारवड पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. हवालदार मुकेश साळुंखे पुढील तपास करीत आहेत.



## संपादकीय

# परदेशी हातांवर वेळीच नियंत्रण राखणे गरजेचे!

भारताच्या देशांतर्गत सुरक्षिततेचे प्रश्न नेहमीच वेगवेगळ्या कारणांनी चर्चेमध्ये येत असतात. राष्ट्रीय तपास यंत्रणा अलीकडच्या काळामध्ये अधिक सतर्क राहून अंतर्गत अस्थिरता निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींचा शोध घेत आहेत. गेल्या आठवड्यात दिल्लीमध्ये काही दहशतवादी कारवाया करण्यासाठी नेटवर्क तयार करणाऱ्या लोकांना अटक झाली होती. या संदर्भात महाराष्ट्रातही काही ठिकाणी छापे घालून त्याचे धागे तपासण्याचा प्रयत्न केला गेला आहे. देशाच्या सीमावर्ती भागातून नेहमीच धोकादायक परिस्थिती पाहायला मिळत असते. मग पाकिस्तानकडून होणारी काश्मीरमधील घुसखोरी असेल, बांगलादेशातून पश्चिम बंगाल, आसामच्या माध्यमातून होणारी तस्करी असेल किंवा शस्त्रांचा बेकायदेशीर व्यापार असेल. श्रीलंकेतूनही तमिळनाडूमध्ये बेकायदेशीरपणे येणाऱ्या लोकांचे प्रमाण नेहमीच चर्चेमध्ये राहिलेले आहे. सगळ्याच सीमावर्ती भागांत भारतीय सैन्याला अतिशय जागृत राहावे लागते. चीनकडून सुद्धा सीमारेषेवर केव्हा कशा प्रकारचा प्रसंग निर्माण होईल याची शाश्वती देता येत नाही. म्हणजे एकीकडे सीमावर्ती भागांत सतत डोळ्यांत तेल घालून लक्ष दिले जात असताना आता तर परदेशातून काही लोक भारतात येतात आणि दहशतवादी प्रशिक्षण देण्यासाठी काही जातीवादी किंवा वार्षिक गटांना ते प्रोत्साहित करत असल्याचे समोर आलेले आहे. दोन दिवसांपूर्वीच राष्ट्रीय तपास यंत्रणेने जवळपास सात परदेशी नागरिकांना अटक केली. त्यामध्ये एक अमेरिकन नागरिक असून ६ युक्रेनियन नागरिक असल्याचे स्पष्ट झालेले आहे. हे लोक विशेषतः भारताच्या पूर्व भागात ज्याला आपण सेवन सिस्टर्स म्हणतो अशा राज्यांमध्ये जाऊन तिथल्या वंशिक किंवा जातीय संघर्ष होत असलेल्या घटकांशी संधान साधतात आणि त्यांना वेगवेगळ्या पद्धतीने भारतविरोधी प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. या परदेशी नागरिकांनी अधिकृत विजा घेऊन जरी भारतात प्रवेश केलेला असला तरी अशा परदेशी नागरिकांना सुद्धा भारताच्या ठराविक भागांमध्ये प्रवेश करायला किंवा तेथे जायला पूर्णपणे प्रतिबंध केलेला असतो. हा प्रतिबंध असूनही त्या नियमांचे उल्लंघन करून हे सातही परदेशी नागरिक मणिपूर, मिझोराम आणि म्यानमारमध्ये पोहाचले. तेथे काही फुटीरतावादी आणि वंशिक गटाच्या लोकांना शस्त्रास्त्र प्रशिक्षण देण्यापासून ते त्यांना ड्रोनचा पुरवठा करण्यापर्यंतचे उद्योग करत असल्याचे चौकशीतून निष्पन्न झालेले आहे.

नव्याने बाहेर येत असलेल्या माहितीतून या लोकांनी म्यानमारमध्ये युरोपमधून ड्रोन आणले आहेत आणि त्या ड्रोनचा वापर ते भारताविरुद्ध करणार असल्याचाही खुलासा या चौकशीतून झालेला आहे. हा भारताच्या इतिहासातील पहिला प्रकार आहे. इतक्या मोठ्या संख्येने परदेशी नागरिक येऊन भारताविरुद्ध कटकारस्थान करताना पोलिसांच्या हाती लागलेले आहेत. याचा अर्थ परदेशी एजन्सीज भारताच्या अंतर्गत भागांमध्ये कशा प्रकारची ढवळाढवळ करतात आणि भारताला अस्थिर करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करतात हे या नव्या प्रकारातून सिद्ध झालेले आहे. खरेतर डिसेंबर १९९५ मध्ये पश्चिम बंगालमध्ये पुरुलिया शस्त्र प्रकरण घडले होते. त्यावेळी सुद्धा एका अमेरिकन नागरिकाने नेपाळच्या माध्यमातून पश्चिम बंगालमधल्या पूरलिया या गावात मोठ्या प्रमाणावर हवाई मार्गाने शस्त्रास्त्रे टाकली होती. ते प्रकरण त्यावेळेला प्रचंड गाजले होते. रशियाकडून आलेला हा शस्त्रसाठा थेट भारताच्या भूमीवर उतरण्यात आला होता. त्यामध्ये एके ४७ बंदुका होत्या शिवाय बरीच मोठी काडतुसेदेखील त्यावेळेला त्या शस्त्रसाठ्यामध्ये सापडली होती. त्यामध्ये परदेशी एजन्सीचाच हात असल्याचे सिद्ध झाले होते. जेणेकरून पश्चिम बंगाल आणि त्या भागातली छोटी छोटी राज्य सतत भडकवत ठेवण्याचा आणि त्यांना शस्त्र पुरवठा करून त्या भागात अशांतता निर्माण करण्याचा डाव आखला गेला होता.

आता तर या परदेशी नागरिकांनी थेट भारतात येऊन भारताविरुद्धच कटकारस्थान करण्यासाठी योजनाबद्ध षडयंत्र केल्याचे स्पष्ट झालेले आहे. हा प्रकार अतिशय गंभीर स्वरूपाचा असून युक्रेन सरकारने ही अटक बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. परंतु युक्रेन नागरिकांकडून यापूर्वी सुद्धा वेगवेगळ्या प्रकारच्या बेकायदेशीर घटना घडल्याचे सांगितले जाते परंतु ते इतक्या उघडपणे स्पष्ट झाले नव्हते. या वेळेला मात्र म्यानमारच्या हद्दीमध्ये शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली आणि तिथे या युक्रेनने नागरिकांच्या वतीने स्थानिक तरुणांना भारताविरुद्धचे दहशतवादी प्रशिक्षण दिले गेल्याचे आढळून आलेले आहे. ही घटना अशासाठी महत्त्वाची ठरते की, भारतासारख्या लोकशाहीवादी देशांमध्ये सतत अस्थिरता निर्माण करण्याचा नियोजनबद्ध प्रयत्न जगातले काही देश जाणीवपूर्वक करत असतात. मग ती राजकीय अस्थिरता असेल किंवा आर्थिक अस्थिरता असेल यासाठी सातत्याने राज्य धुमसत ठेवायची तिथे जातीय संघर्ष पेटवत ठेवायचे याच उद्देशाने मणिपूरमध्ये सलग दोन-तीन वर्षे जो वंशिक संघर्ष पेटत राहिला त्यामागे सुद्धा याच परदेशी एजन्सीचा हात असल्याचे आता हळूहळू समोर येते आहे. शस्त्र प्रशिक्षणाबरोबरच यासाठी आवश्यक असलेले फंडिंग परदेशातून केले जाते काही देश विघातक शक्तींना जाणीवपूर्वक हे फंडिंग झाल्याचे आता स्पष्ट होते आहे. भारताला अस्थिर करणारा हा परदेशी हात देशांतर्गत सुरक्षिततेपुढे निर्माण झालेले तितकेच मोठे आव्हान ठरते. अशा प्रकारचे आणखीनही काही परदेशी एजंट देशाच्या काही भागात कटकारस्थान करण्यासाठीच मुक्काम ठोकून असण्याची शक्यता नाकारता येत नाही या सात परदेशी नागरिकांची अटक म्हणजे देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेपुढे बाह्य शक्तींनी निर्माण केलेले मोठे संकट ठरते. याचा अर्थ अनेक प्रकारची असलेले भौगोलिक किंवा भाषिक, वांशिक विविधता जपण्यासाठी किंवा ती सुरक्षित ठेवण्यासाठी किती जागरूक राहाणे आवश्यक आहे, हे स्पष्ट होते.

# एसटी बसमध्ये सापडलेले पैसे केंद्रप्रमुखाकडून तत्काळ परत



*अमळनेर : तालुक्यातील गडखांब येथील महिलेचे एसटी बसमध्ये हरवलेले पैसे व कागदपत्रे प्रामाणिकपमे परत करताना केंद्रप्रमुख शिक्षक राजेंद्र पाटील. शेजारी सी. के. जाधव, लीलाधर पाटील आदी.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुलीच्या आजारावरील उपचारासाठी नेलेले पैसे महिलेकडून एसटी बसमध्ये हरवले. मात्र, केंद्रप्रमुखाच्या प्रामाणिकपणामुळे संबंधित महिलेस तत्काळ ते परत मिळाले.

याबाबत माहिती अशी, की तालुक्यातील गडखांब येथील कल्पना संजय पाटील या आपल्या आजारी मुलीला शिरसोली येथे भेटण्यासाठी येथून जळगाव बसमधून जात होत्या. त्यांनी स्वतंत्र फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन त्यातील दहा हजार रुपये मुलीच्या आजारावरील उपचारासाठी सोबत नेले होते. याच बसमधून येथील केंद्रप्रमुख शिक्षक राजेंद्र पाटील देखील प्रवास करीत होते. संबंधित महिला जळगावात आकाशवाणी चौकात उतरली आणि बस जळगाव स्थानकात गेली. तेथे सर्व प्रवासी खाली उतरले. बस आगारात जाऊन एक तास थांबली. याचवेळी केंद्रप्रमुख पाटील हे संभाजीनगरला जाण्याकरिता बसची फलाटावर वाट पाहत होते. सुदैवाने अमळनेरहून आलेलीच बस आगारातून बाहेर पडून संभाजीनगरसाठी लागली. त्यात अनेक प्रवाशी चढल्यानंतर देखील श्री. पाटील यांना प्लास्टिक पिशवी एका सीटवर पडलेली दिसली. पिशवीत गडखांब येथील महिलेचे बँक पासबुक, पॅन कार्ड, आधार कार्ड आणि रोख दहा हजार रुपये होते. श्री. पाटील यांनी संबंधित महिलेचा मोबाईल नंबर शोधून त्यांना यासंदर्भात कळविले. त्यानंतर सदर महिला परत आल्यानंतर त्यांना ती रक्कम व पिशवी प्रामाणिकपणे परत करण्यात आली. श्री. पाटील यांच्या प्रामाणिकपणाचे संबंधित महिलेने आभार मानले. यावेळी सी. के. जाधव, लीलाधर पाटील हेही उपस्थित होते.

# मोबाईल फोन चार्ज करताना लक्षात ठेवा ४०–८० चा नियम!

## खूप वेळ चार्ज केल्याने बॅटरीचे आयुष्य झपाट्याने होते कमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात अनेक लोकांची कामे ही मोबाईल फोनवरच अवलंबून असतात. सकाळी उठल्यापासून अनेकजण मोबाईल फोनवरच गुंतलेले असतात. मात्र मोबाईल फोन वापरताना सर्वांत महत्त्वाची असते ती फोनची बॅटरी. ही बॅटरी जास्त काळ टिकावी, यासाठी योग्य पद्धतीने बॅटरीचा वापर करणे अतिशय महत्त्वाचे असते. ज्यामुळे तिचे आयुष्य जास्त काळ टिकते.



मोबाईल फोनची बॅटरी जास्त काळ टिकण्यासाठी काही टिप्स फॉलो करणे गरजेचे असते. यासाठी आपण ४०–८० चा चार्जिंग नियम पाळायला हवा. या नियमानुसार मोबाईल फोन ४० टक्क्यांपेक्षा कमी चार्ज ठेवू नये आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त चार्ज करू नये.

लिथियम–आयन बॅटरी आज–काल बहुतेक मोबाईल फोनमध्ये वापरल्या जातात. त्या ठराविक संख्येच्या डिस्चार्ज–चार्ज सायकलसाठी चार्ज केल्या जाऊ शकतात. जेव्हा आपण मोबाईल फोन ० टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत चार्ज करता तेव्हा डिस्चार्ज चार्ज सायकल पूर्ण करतो. मोबील फोनच्या बॅटरीवर जितकी जास्त डिस्चार्ज–चार्ज सायकल करतो तितक्या लवकर ती खराब होते. म्हणून ४०–८० च्या चार्जिंग नियमाचे पालन करून मोबाईल फोनच्या बॅटरीचे आयुष्य वाढवू शकतात.

‘अ‍ॅपल’ची वेगळी वैशिष्ट्ये ‘अ‍ॅपल’च्या बॅटरी वापरण्यावर अनेकांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात अ‍ॅपलने मोबाईल फोन ८० टक्क्यांपर्यंत चार्ज ठेवावा, असे म्हटले आहे. यामुळे बॅटरीचे आरोग्य सुधारते. अ‍ॅपलचे म्हणणे आहे, की बॅटरी खूप वेळ चार्ज केल्याने तिचे आयुष्य झपाट्याने कमी होते. म्हणून मोबाईल फोन २० टक्क्यांपेक्षा कमी चार्ज झाल्यावरच चार्ज करावा.

# ससाणा : शिकारी पक्षी




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**नाव :** ससाणा
**रंग :** करडा, वरचे पंख काळपटपोटावर आडवे करडे पट्टे, पाय पिवळे
**चोच :** बाकदार, लहान, अणकुचीदार असून चोचीचा रंग करडा
**डोळे :** तीक्ष्ण व भेदक. ससाणा पक्षाची नजर माणसाच्या डोळ्यांपेक्षा लाख पट शक्तिशाली असते. डोळे काळे व त्या भोवती पिवळे वर्तुळ असते.
**घरटे :** ससाणा उंच झाडांवर, ओसाड इमारतींवर काड्यांच्या घरट्यात राहतो. खडकाळ सुरक्षित जागी असल्यास एकच घरटे चार पाच वर्ष वापरतो.
**अंडी :** मादी मे महिन्यात चार पाच अंडी घालते. अंड्यांचा रंग करडा असून त्यावर विटकरी रंगाचे ठिपके असतात.
**भक्ष :** ससाणा हा शिकारी पक्षी आहे. तो साप, उंदीर, सरडे, कबुतर, पोपटाची पिल्ल यांची शिकार करून खातो.
**आवाज :** कर्कश आहे. उडतांना, शिकार करतांना तो किंचाळतो. झडप घालतांना आक्रमक ओरडतो.
**इतर वैशिष्ट्ये :** ससाणा जलद वेगात उडतो.मांसाहारी असल्यामुळे शिकार करून जगतो.लहान पक्षांना तो हवेतच पकडतो. हवेत उडतांना त्याचा वेग विमाना सारखा असतो.नखं आणि चोच ही त्याची शिकारीची हत्यारे आहेत.

**संग्राहक :**
**प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर**

# सोने, चांदीचे दर घसरले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या दरात चांगलीच घसरण सुरू आहे. आठवडाभरात इराण–इस्रायल युद्धामुळे सोने, चांदीचे दर वाढण्याऐवजी कमी झाले आहेत. सध्याचा घसरलेला दर पाहता सोन्यात गुंतवणूक करण्याची हीच योग्य वेळ असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगत आहेत.

जळगावातील सुवर्ण बाजारपेठेत एका आठवड्यात सोन्याचा दर साधारण ५.९८ टक्के घसरला आहे. रविवार, दि. २२ मार्च रोजी सोन्याचा दर प्रति १० ग्रॅमला एक लाख ४६ हजार रुपये होता. तर चांदीचा दर प्रतिकिलो दोन लाख ३२ हजार रुपये होता. गेल्या सोमवारी २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति १० ग्रॅमला एक लाख ५६ हजार ४३६ रुपये होता. म्हणजेच आठवडाभरात सोन्याचे दर साधारण १०, ४३६ रुपयांनी घसरले आहेत. तज्ज्ञांच्या मते सोन्याचे दर आणखी घसरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे वक्तृत्व, निबंध स्पर्धा

## महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची २०० वी व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे १८ वर्षांवरील सर्वांसाठी खुल्या निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांचे जीवन व कार्य तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्य हे विषय आहेत. निबंध ८०० ते १००० शब्दांत असावा. वक्तृत्व स्पर्धेसाठी एकूण ८ मिनिटे वेळ असेल. दोन्ही स्पर्धेसाठी स्वतंत्र बक्षिसे आहेत. प्रथम : १००० रुपये, द्वितीय : ७५०, तर तृतीय ५०० रुपये रोख. स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश शुल्क नाही. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. निबंध फुलस्केप कागदाच्या एका बाजूला लिहून तो १० एप्रिल २०२६ पर्यंत प्रा. अशोक पवार (२८, विठ्ठलनगर, पिंपळे रोड, अमळनेर- 94222 78256), हृदयनाथ गोविंद मोरे (सिद्धांत मल्टी सर्विसेस, बुद्धविहारशेजारी, स्टेशन रोड, अमळनेर- 94215 12085 ), महाराष्ट्र झेरॉक्स (भद्रा प्रतीक मॉलसमोर, प्रताप कॉलेज रोड, अमळनेर- 86053 78916) यांच्याकडे द्यावा. वक्तृत्व स्पर्धा रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता अभ्यासिकेत (द्वारा- प्रा. अशोक पवार, २८, विठ्ठलनगर, पिंपळे रोड, अमळनेर, जि. जळगाव.) होईल. विद्यार्थी, महिला, नोकरी, व्यवसाय करणारे, ज्येष्ठ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धेत १८ वर्षांवरील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजन समितीतर्फे करण्यात आले आहे.

# पासपोर्ट : जागतिक संधींचे प्रवेशद्वार

**– अ‍ॅड. सारांश धनंजय सोनार (विधीज्ञ व कायदेविषयक अभ्यासक)**

काही वर्षांपूर्वीपर्यंत ‘पासपोर्ट’ हा शब्द केवळ उच्चभ्रू वर्गापुरता मर्यादित होता. ‘आपल्याला कुठे परदेशात जायचे? कशाला हवा पासपोर्ट?’ अशा संकुचित विचाराने सामान्य माणूस या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करायचा. पण आजकाल पूर्णपणे बदलला आहे. ग्लोबल व्हिलेजच्या या युगात शिक्षण, नोकरी, व्यवसाय किंवा पर्यटनासाठी देशाची सीमा ओलांडणे आता स्वप्न राहिलेले नाही. पासपोर्ट हे केवळ प्रवासाचे साधन नसून भारतीय नागरिकत्वाचा जागतिक स्तरावरील भक्कम पुरावा ठरले आहे. परंतु जर एखाद्यावर एफआयआर दाखल असेल किंवा क्रिमीनल केस सुरू असेल, तर पासपोर्टचे स्वप्न कायमचे भंगते का? हा प्रश्न अनेकांना सतावत आहे. याच कळीच्या प्रश्नाचे कायदेशीर उत्तर आणि पासपोर्ट मिळविण्याचा संपूर्ण प्रवास आपण या लेखातून उलगडणार आहोत.

### पोलीस केस किंवा कोर्टात प्रकरण सुरू असल्यावरही पासपोर्ट मिळू शकतो का?

अनेकदा आंदोलने किंवा अनपेक्षित कारणांमुळे नागरिकांवर फौजदारी गुन्हे दाखल होतात. अशा वेळी ‘मला पासपोर्ट मिळणार का? माझी परदेशात जायची इच्छा पूर्ण होणार का?’ ही धाकधूक मनात असते. पण काळजी करू नका. अशा कायदेशीर अडचणीत भारतीय संविधान आणि ‘पासपोर्ट कायदा १९६७’ नागरिकांच्या पाठीशी उभा राहतो. जर खटला प्रलंबित असेल आणि दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल झाले असेल, तर पासपोर्ट कायद्याच्या ‘कलम ६ (२) (एफ)’ नुसार अधिकारी थेट पासपोर्ट देऊ शकत नाहीत. पण याचा अर्थ प्रवासाचे रस्ते कायमचे बंद झाले असा होत नाही. केंद्र सरकारच्या ‘जी.एस.आर. ५७० (ई)’ या अधिसूचनेनुसार जर तुम्ही संबंधित न्यायालयाची (ट्रायल कोर्ट) परवानगी किंवा ‘ना हरकत प्रमाणपत्र’ मिळविले, तर प्रलंबित खटला असतानाही पासपोर्ट कार्यालय तुम्हाला पासपोर्ट जारी करू शकते. यासाठी वकिलांच्या मदतीने न्यायालयात प्रकरण दाखल करणे आवश्यक ठरते.




भारतीय न्यायव्यवस्थेने वेळोवेळी नागरिकांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याची आणि अधिकारांची पाठराखण केली आहे. संविधानाचे ‘कलम २१’ सन्मानाने जगण्याचे आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे अधिकार देते. सर्वोच्च न्यायालयाने ‘मनेका गांधी विरुद्ध भारत सरकार’ या खटल्यात बजावले आहे, की परदेश प्रवास हा नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. ‘जी.एस. प्रसन्न विरुद्ध भारत सरकार’ या खटल्यात उच्च न्यायालयाने नमूद केले आहे, की केवळ खटला प्रलंबित आहे म्हणून पासपोर्ट रोखणे हे उपजीविकेच्या आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारावर गदा आणण्यासारखे आहे. कारण जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही तोपर्यंत व्यक्ती निर्दोष असते आणि तिला प्रवासाच्या हक्कापासून कायदेशीर प्रक्रियेशिवाय वंचित ठेवता येणार नाही.

### पासपोर्ट : दस्तऐवज नव्हे, तर कायदेशीर अधिकार

शांततेच्या काळात पासपोर्ट काढून ठेवणे दूरदृष्टीचे आणि शहाणपणाचे ठरते. पासपोर्ट हा केवळ परदेश प्रवासासाठी नसून, तो पत्ता आणि जन्मतारखेचा विश्वसनीय पुरावा मानला जातो. बँका, सरकारी कार्यालये किंवा इतर महत्त्वाच्या ठिकाणी पासपोर्टला ‘प्रथम श्रेणी’ पुराव्याचा मान मिळतो. भारतीय पासपोर्ट धारकांसाठी अनेक देशांमध्ये ‘व्हिसा ऑन अरायव्हल’ किंवा ‘व्हिसा फ्री’ एंट्रीची सुविधा उपलब्ध असल्याने जागतिक संचार अधिक सुकर झाला आहे. आजच्या डिजिटल युगात भारतीय पासपोर्ट काढण्याची प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ झाली आहे. सामान्य नागरिक ‘पासपोर्ट सेवा’ पोर्टल किंवा ‘एम पासपोर्ट सेवा’ अ‍ॅपच्या माध्यमातून घरबसल्या अर्ज करू शकतात. ज्यामुळे एजंटची गरज उरलेली नाही.

### पारदर्शकता आणि तांत्रिक बारकावे : जप्तीचे अधिकार कोणाला?

कायद्याने अधिकार दिले असले तरी अर्जात पारदर्शकता राखणे अनिवार्य आहे. पासपोर्टसाठी अर्ज करताना गुन्ह्याची माहिती लपवणे ही मोठी चूक ठरते. पासपोर्ट कायद्याच्या ‘कलम १२’ नुसार माहिती दडवणे हा दंडनीय अपराध असून, यामुळे ५००० रुपयांपर्यंत दंड किंवा पासपोर्ट कायमचा रद्द होऊ शकतो. ‘कलम १० (३)’ नुसार केवळ पासपोर्ट अधिकारीच पासपोर्ट जप्त करू शकतात. पोलिसांना हा अधिकार नाही. पोलीस तो केवळ कायदेशीर प्रक्रियेसाठी कोर्टात सादर करू शकतात. गंभीर खटल्यांमध्येही जवळच्या नातेवाईकाचे निधन, लग्न किंवा वैद्यकीय आणीबाणी यांसारख्या मानवतावादी कारणास्तव न्यायालय ‘तातडीची सुनावणी’ घेऊन प्रवासाची मुभा देऊ शकते.

### कायदेशीर जागरूकतेची गरज

फौजदारी केस सुरू असणे गंभीर असले, तरी तो प्रगतीच्या वाटेतील कायमचा अडथळा ठरू शकत नाही. ‘जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत व्यक्ती निर्दोष असते’ हे भारतीय न्यायव्यवस्थेचे तत्त्व प्रवासाच्या अधिकारालाही लागू पडते. अनेकदा माहितीच्या अभावामुळे नागरिक चुकीचे पाऊल उचलतात किंवा माहिती लपवून संकट ओढवून घेतात. कायदेशीर मार्गाचा अवलंब, पारदर्शकता आणि न्यायालयीन प्रक्रियेवरील विश्वास हाच यशाचा मार्ग आहे. भीतीपोटी स्वप्ने अधुरी सोडू नका; कायद्याच्या मदतीने परदेशवारी निश्चित करा. पासपोर्ट केवळ दस्तऐवज नसून ती आपली वैश्विक ओळख आहे. स्वप्ने जितकी मोठी असतील, तितकाच भारतीय कायदा हक्कांचा सजग राखणदार म्हणून पाठीशी उभा राहील.


**(लेखक मुंबई उच्च न्यायालय व जिल्हा व सत्र न्यायालयात अधिवक्ता म्हणून म्हणून कार्यरत आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# दिवसा ऑफिसची ड्यूटी, रात्री पुस्तकांशी मैत्री

## ३ वेळा अपयशी, मग अशी झाली आयएफएस अधिकारी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशातील अवघड परीक्षांमधील एक मानली जाणारी परीक्षा म्हणजे यूपीएससी. दरवर्षी लाखो उमेदवार परीक्षा देतात. धैर्य, व्यासंग आणि सातत्य असेल तीच व्यक्ती परीक्षा पास होतात. अशीच एक व्यक्ती म्हणजे पूज्य प्रियदर्शिनी. जी तीन वेळा अयशस्वी झाली. मात्र तरीही तिने हार मानली नाही आणि मेहनत सुरू ठेवली, अखेर ती २०१८ मध्ये एआयआर ११ वा क्रमांक मिळवून आयएफएस अधिकारी बनली.

### पहिल्या प्रयत्नात अपयशी

पूज्य प्रियदर्शिनी यांनी २०१३ मध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. यानंतर त्यांनी पहिल्यांदा यूपीएससीची परीक्षा दिली. पहिल्या प्रयत्नात त्यांना यश मिळू शकले नाही. मात्र त्यांनी हार मानली नाही आणि पुन्हा तयारी सुरू केली.

### दिल्ली ते न्यूयॉर्क आणि पुन्हा यूपीएससीचे स्वप्न...

दिल्ली विद्यापीठातून बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्या न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठात गेल्या. येथे त्यांनी प्रशासन विषयात पदव्युत्तर

**सक्सेस स्टोरी**

शिक्षण घेतले. यादरम्यान त्यांनी नोकरीसह यूपीएससीची तयारी सुरू केली. पदव्युत्तर अभ्यास, नोकरी आणि यूपीएससीची तयारी अशा तिन्ही गोष्टी त्या एकाच वेळेस करीत होत्या. प्रियदर्शिनी दिवसा नोकरी करीत होत्या, रात्री अभ्यास आणि यूपीएससीच्या तयारीसाठी नोट्स तयार करीत होत्या.

बऱ्याचदा पाहिले जाते, सरकारी नोकरीच्या तयारीसाठी अनेकजण हातातील नोकरी सोडून देतात. मात्र पूज्य यांनी वेगळा आणि खडतर मार्ग निवडला. मर्यादित वेळेत अभ्यास पूर्ण करून, त्यांनी शिस्त, वेळेचे व्यवस्थापन आणि स्वनियंत्रण दाखविले, जे स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी खूप महत्त्वाचे असते.

### आई-वडिलांचा पाठिंबा, रणनीतीत बदल...

२०१६ मध्ये पूज्य प्रियदर्शिनी यांना यश मिळविता आले नाही. २०१७ मध्ये त्यांना प्रारंभिक परीक्षाही पास करता आली नाही. ज्यानंतर त्या खचल्या होत्या. त्यांनी यूपीएससीची तयारी सोडण्याचा निर्णय घेतला. मात्र यादरम्यान कुटुंबाने त्यांना साथ दिली. प्रियदर्शिनीचे पालकही नागरी सेवांशी संबंधित होते. त्यामुळे त्यांना यूपीएससीचे स्वरूप माहीत होते.

पूज्य यांनी पुन्हा अभ्यासाला सुरूवात केली आणि आपल्या अभ्यासाच्या रणनीतीवर गहन विचार केला आणि त्यात बदलही केला. त्यांनी कमकुवत विषयांवर लक्ष केंद्रित केले आणि त्याच्या तयारीची रणनीती आखली. ही बदललेली रणनीती त्यांच्या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

### २०१८ मध्ये यश, मग आयएफएसची निवड का केली?

प्रियदर्शिनी यांच्या मेहनतीला २०१८ मध्ये फळ मिळाले. त्यांना एआयआरमध्ये ११ वी रँक मिळाली. पूज्य यांना चांगली रँक मिळाली होती. त्यांना प्रशासकीय सेवा निवडण्याचा पर्याय होता. मात्र तरीही त्यांनी भारतीय परराष्ट्र सेवेची निवड केली. त्यांचा कल आंतरराष्ट्रीय संबंधात होता. त्यासाठी त्यांनी आयएफएसची निवड केली.

**शहीद दिन विशेष**

# भारतीय इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या महान क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी २३ मार्च हा दिवस शहीद दिन म्हणून पाळला जातो. हा दिवस भारतीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी दिवस आहे. याच दिवशी भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव या तिघा तरुण क्रांतिकारकांना १९३१ मध्ये ब्रिटीश सरकारने फाशी दिली होती.



### शहीद दिनाचे महत्त्व

शहीद दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर देशभक्ती, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेची जाणीव करून देणारा दिवस आहे. या दिवशी आपण त्या वीरांना आठवतो ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. त्यांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत.

### भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांचे योगदान

भगतसिंह हे तरुण वयातच क्रांतिकारक विचारांनी प्रेरित झाले होते. त्यांनी ब्रिटीश सत्तेविरोधात आवाज उठवला आणि देशातील युवकांमध्ये स्वातंत्र्याची ज्योत पेटवली. राजगुरू हे अतिशय धाडसी आणि नेमबाज होते, तर सुखदेव यांनी संघटनात्मक कामात मोठे योगदान दिले. १९२८ मध्ये लाला लजपत राय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी या तिघांनी ब्रिटीश अधिकारी सॉन्डर्सवर हल्ला केला. त्यानंतर त्यांनी स्वतःहून अटक स्वीकारली आणि न्यायालयातही आपल्या विचारांचा प्रचार केला. त्यांच्या निर्भयतेमुळे ते संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान बनले.

### शहीद दिन कसा साजरा केला जातो?

या दिवशी देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये देशभक्तीपर कार्यक्रम, भाषणे, निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात. अनेक ठिकाणी शहीद स्मारकांवर पुष्पचक्र अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली जाते.

### आजच्या पिढीसाठी संदेश

शहीद दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतोदेशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा. आजच्या काळात देशभक्ती म्हणजे केवळ युद्धात लढणे नाही, तर प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडणे, समाजासाठी कार्य करणे आणि देशाच्या प्रगतीत योगदान देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. शहीद दिन हा आपल्या इतिहासातील एक उज्ज्वल अध्याय आहे. भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांचे बलिदान कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य करण्याची शपथ घेऊया.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे क्रांतिवीर भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांना विनम्र अभिवादन!**




# हवामानातील बदलांच्या जाणिवेचा दिवस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २३ मार्च हा दिवस जागतिक हवामान दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून हवामान, वातावरण आणि त्यातील बदल याबाबत जनजागृती केली जाते. हा दिवस जागतिक हवामान संघटना (डब्ल्यूएमओ) च्या स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. १९५० मध्ये या संघटनेची स्थापना झाली आणि तेव्हापासून हवामानशास्त्राच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे.

### हवामान दिनाचे महत्त्व

जागतिक हवामान दिन आपल्याला हवामानातील बदलांची जाणीव करून देतो. सध्याच्या काळात हवामान बदल ही जगासमोरील गंभीर समस्या बनली आहे. तापमान वाढ, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व अधिक वाढले आहे.

### हवामान बदलाची कारणे

हवामान बदलामागील प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे-

- औद्योगिकीकरणामुळे वाढलेले प्रदूषण
- जंगलतोड आणि हरित क्षेत्रांचा अभाव
- जीवाश्म इंधनांचा अतिवापर
- वाढती लोकसंख्या आणि शहरीकरण

या सर्व कारणांमुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढते आणि पृथ्वीचे तापमान वाढते.

### परिणाम आणि धोके

हवामान बदलाचे परिणाम दूरगामी आणि गंभीर आहेत. समुद्राची पातळी वाढणे, हिमनद्या वितळणे, जैवविविधतेला धोका निर्माण होणे यांसारख्या समस्या निर्माण होत आहेत. शेती, पाणीपुरवठा आणि आरोग्य यावरही याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी मोठे संकट उभे राहू शकते.

### उपाययोजना आणि जबाबदारी

हवामान बदलावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. खालील उपाय महत्त्वाचे ठरू शकतात.

- झाडे लावणे आणि जंगलांचे संवर्धन करणे
- नवीकरणीय उर्जेचा वापर वाढविणे
- पाणी आणि ऊर्जा यांची बचत करणे
- प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरणपूरक साधनांचा वापर करणे

### भारताची भूमिका

भारत हवामान बदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध योजना राबवत आहे. सौरऊर्जा, वाऱ्याची ऊर्जा यांसारख्या क्षेत्रात भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारत सक्रिय भूमिका बजावत आहे. जागतिक हवामान दिन हा केवळ एक दिवस नसून, तो आपल्याला पर्यावरणाबद्दलची जबाबदारी समजावणारा संदेश आहे. हवामान बदल ही समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज घेतलेली योग्य पावले उद्याच्या सुरक्षित आणि सुंदर पृथ्वीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरतील.

# होर्मुजच्या समुद्रधुनीतून जहाज सोडण्यासाठी इराण किती पैसे घेतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इराण विरुद्ध अमेरिका, इस्रायल युद्धामुळे जगभरात होर्मुजची समुद्रधुनी चर्चेत आहे. येथून अनेक देशांना कच्च्या तेलाची वाहतूक होते. युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने ही समुद्रधुनी बंद केली आहे. मात्र भारताचे तीन जहाज इराणने सोडलेले आहेत. इराण या समुद्रधुनीवर जहाज सोडण्यासाठी किती रुपये आकारत होता किंवा टोल घेत होता का, हा प्रश्न सोशल मीडियात चर्चेत आहे.

शुल्क वास्तविकता अशी आहे, की होर्मुजमधून जाताना इराण अधिकृतपणे कोणतेही शुल्क किंवा ट्रांझिट फी घेत नाही. टांझिट पॅसेज आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार जहाजांना या समुद्रधुनीतून जाताना इनोसंट पॅसेज किंवा टांझिट पॅसेजचा अधिकार आहे. त्यामुळे इराण अधिकृतपणे शुल्क आकारू शकत नाही. इराणला वेगळ्या मार्गांनी येथून महसूल मिळतो. त्यातील अनेक प्रकार अनधिकृतच आहेत. जहाजांना दिशा दाखविणाऱ्या यंत्रणेचा वापर केल्याचे शुल्क द्यावे लागते. तसेच लूट किंवा इतर संकटांपासून वाचण्यासाठी इराणच्या कोस्ट गार्डला शुल्क द्यावे लागते. याशिवाय इराणच्या बंदरामध्ये जहाज थांबवायचे असेल तर तज्ज्ञ मार्गदर्शकाची मदत घ्यावी लागते. त्यासाठी इराण ५ ते १५ हजार डॉलर शुल्क आकारतो.

जर एखादे जहाज इराणच्या कुठल्याही बंदरात दुरुस्तीसाठी किंवा इंधन भरण्यासाठी थांबलेले असेल, तर त्याच्या वजनानुसार २ हजार ते १० हजार प्रतिदिन शुल्क आकारला जातो. तसेच जर इराणने संघर्षाच्या काळात होर्मुज समुद्रधुनी बंद केली तर वॉर रिस्क इन्शुरन्स २० हजार ते ५० हजार डॉलर म्हणजे १६ ते ४० लाख रुपये इतके पैसे मोजावे लागतात.

# क्या इंडक्शन चूल्हे को घंटों चलाना सुरक्षित है?

## बड़ी कंपनियां देती हैं ये ५ सावधानियां रखने की सलाह


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एलपीजी गैस सिलेंडर की किल्लत की खबरों के बीच बड़ी संख्या में लोग इंडक्शन चूल्हा खरीद रहे हैं। ऐसे में सवाल उठता है कि क्या इंडक्शन चूल्हे का इस्तेमाल ठीक उसी तरह किया जा सकता है, जिस तरह से एलपीजी गैस का इस्तेमाल होता है। मसलन, लंबे समय तक इंडक्शन चूल्हे को चलाना आदि। मिल्टॉन जैसी कई बड़ी कंपनियां इंडक्शन चूल्हें के साथ ५ तरह के जरूरी एहतियात बरतने पर जोर देते हैं। इससे न सिर्फ इंडक्शन चूल्हा लंबे समय तक काम करता है, बल्कि बिजली भी बचती है। इंडक्शन के साथ बरते जाने वाली ५ सावधानियों में सही बर्तन का इस्तेमाल, ब्रेक देना, तापमान पर नियंत्रण, एयर वेंड्स की सफाई और सुरक्षित सतह पर इस्तेमाल करना शामिल होता है।

### सही बर्तन का इस्तेमाल

इंडक्शन चूल्हे के साथ जरूरी है कि आप सही बर्तन का इस्तेमाल करें। इसके लिए आप इंडक्शन फ्रेंडली बर्तन इस्तेमाल करें। इससे इंडक्शन चूल्हे पर बर्तन को गर्म होने में समस्या नहीं होती। जिससे कि बिजली बचती है और इंडक्शन चूल्हे पर भी लोड नहीं पड़ता।





### तापमान पर नियंत्रण

मिल्टॉन और कई अन्य बड़ी कंपनियां, (आरईएफ) सुझाव देती हैं कि क्योंकि इंडक्शन बहुत तेजी से गर्म होता है इसलिए, शुरुआत में तापमान को कम रखें और इसे धीरे-धीरे बढ़ाएं। इससे खाना तो चलने से बचता ही है साथ ही लोड कंट्रोल में रहने से इंडक्शन की उम्र भी बढ़ जाती है।

### लंबे इस्तेमाल के बाद ब्रेक दें

एलपीजी गैस चूल्हे को हम बिना रुके उतनी देर तक इस्तेमाल कर सकते हैं, जितना कि खाना पकाने के लिए जरूरी है। वहीं इंडक्शन के साथ ऐसा नहीं है। कंपनियां सलाह देती हैं कि अगर आप इंडक्शन चूल्हे को लगातार २ घंटे तक इस्तेमाल कर रहे हैं, तो उसे बीच में कम से कम १५ से ३० मिनट का ब्रेक जरूर दें।

### एयर वेंड्स साफ रखें

कंपनियां बताती हैं कि अक्सर देखा गया है कि समय के साथ चिकनाहट और साफ सफाई के आभाव में इंडक्शन चूल्हे के एयर वेंडस गंदगी से बंद हो जाते हैं। इससे इंडक्शन चूल्हा अपनी ही गर्मी से खराब हो सकता है। ऐसे में जरूरी है कि इंडक्शन के एयर वेंड्स यानी कि वो जगहें साफ और खुली रहें, जो कि इंडक्शन से गर्म हवा निकालने के लिए बनी होती हैं।

### खुले में और सही सतह पर रखकर चलाएं

इंडक्शन कुकटॉप बनाने वाली कंपनियां इंडक्शन कुकटॉप को हमेशा समतल और खुली जगह पर रखकर इस्तेमाल करने की सलाह देती हैं। कहने का मतलब है कि इंडक्शन के आसपास ज्यादा सामान नहीं होना चाहिए। ताकि वह अपनी गर्मी अच्छे से बाहर निकाल सके और ठंडी हवा उसके अंदरूनी पुर्जों तक पहुंचती रहे।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# गृहिणीपणाचा उत्सव : चैत्रगौर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्र शुद्ध तृतीया म्हणजे गौरी तृतीया. गौरी तृतीयेपासून वैशाख शुक्ल तृतीयेपर्यंत गौरीची पूजा करून महिनाभर हा उत्सव साजरा होतो. देवघरातील अन्नपूर्णा लख्ख करून तिची षोडशोपचारे पूजा केली जाते. त्यानंतर तिला महिनाभर झोपाळ्यावर ठेवून हा उत्सव साजरा होतो. अनेक शुभ चिन्हांची रांगोळी 'चैत्रांगण' काढली जाते.

गौरी अन्नपूर्णा कशी झाली याची सुंदर कथा पुराणात येते. गौरी ही भौतिक समृद्धीची देवता. अन्नधान्य, वात्सल्य, धनसंपती, सौंदर्य, मांगल्य, कौटुंबिक सौख्य हे सारे काही तिचीच कृपा. शिव म्हणजे विशुद्ध ज्ञान!योग, वैराग्य, ब्रह्मज्ञान यांचे ते अधिष्ठान. शिव-पार्वती एकदा कैलाशी निवांत गप्पा मारत होते. बोलण्याच्या ओघात भगवान शिव म्हणाले, की 'ब्रह्म सत्यम जगत मिथ्या. फक्त ब्रह्म सत्य आहे बाकी सब झूट'.

पार्वती माता म्हणाल्या, की 'अहो हे सुंदर विश्व'? भगवान शिव म्हणाले, की 'साफ खोटे. आभासी आहे हे'.

विश्वातील सौंदर्य, मांगल्य, नातीगोती ?
तेही असत्य.
बर मग आपण खातो ते अन्न तरी?
तेही खोटे, असत्य, आभासीच, फक्त ब्रह्म तत्त्वच सत्य.

झालेगौरीला आला थोडा राग. ती म्हणाली, की




बरे तुमचे ज्ञान वैराग्यच खरे. बाकी सगळे आभासी ना. या क्षणी मी अंतर्धान होते. गौरी गुप्त होताच जगातील मांगल्य लोपले, नात्यांचा गोडवा उडाला, घराचे घरपण हरपले, सात्विक सौंदर्य विरले, आणि मुख्य म्हणजे जगातील सगळे अन्नधान्य सुद्धा आकस्मिक संपले.

भगवान शिव यांना वाटले, की हरकत नाही. यावाचून जगाचे काही बिघडत नाही. पण थोड्याच वेळात अख्या जगातील देव, मानव, ऋषी, पशू-पक्षी सारे प्राणीमात्र भुकेले होऊन भगवान शिवांपाशी आले. महादेव म्हणाले, की 'थांबा. तुम्हाला जरा ज्ञान देतो. पण भुकेल्या पोटी कसले ब्रह्म? कसले ज्ञान? आधी अन्न द्या. मग पुढचे बोला. पण अन्न आणायचे कुठून? कोणीतरी सांगितले, की संपूर्ण विश्वात फक्त काशी नगरीत एक घर आहे तेथेच अन्न उपलब्ध आहे. सगळ्या प्राणिमात्रांच्या वतीने भगवान शिव याचक म्हणून तेथे भिक्षा मागायला गेले.

**ओम भवति भिक्षां देही|**
आतून एका गृहिणीचा नाजूक आवाज आला. महादेवा भिक्षेत काय देऊ? ज्ञान की वैराग्य ? महादेवांनी पाहिले, आत सुवर्ण सिंहासनी साक्षात पार्वती बसली आहे मांगल्य लेवून, पावित्र्य पांघरून, समृद्धीचे अलंकार घालून आणि तिच्या हातात आहे अन्नाचे अक्षयपात्र, वात्सल्याच्या पळीने ती प्रत्येक जीवाला अन्न देऊन तृप्त करते आहे.

प्रपंचाशिवाय परमार्थ, प्रवृत्तीवाचून निवृत्ती, शक्तीविना भगवान शिव अपूर्णच आहेत. हा साक्षात्कार शिवांना झाला. शिव म्हणाले, की ज्ञान -वैराग्य प्राप्त होण्यासाठी आधी शरीरात शक्ती आणि मनात शांती हवी. त्यासाठी सकस अन्न हवे, अन्न हे पूर्णब्रह्म. त्याचीच भिक्षा दे.

**ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती ।।**

पार्वती माता हसल्या. त्यांनी आनंदाने भगवान शिवांना भोजन दिले. शिव तृप्त होताच जगातील सगळे जीव देखील तृप्त झाले. त्या तृप्त अंतःकरणाने महादेव म्हणाले, की 'तू सदाशिवाला सुद्धा पूर्ण करणारी सदापूर्णा आहेस. जगाची आई बनून अन्न पुरवणारी तू अन्नपूर्णा आहेस. साध्या गृहिणीच्या रूपातील ती शंकरांची प्राणवल्लभा अन्नपूर्णा म्हणून विख्यात झाली.

ही अन्नपूर्णा जगातील सगळ्या गृहिणींचे प्रतीक आहे. सोनेरी महालात राहणाऱ्या रुख्मिणीवर देखील द्वारकेतील सगळ्यांना अन्न देण्याची जबाबदारी होती आणि झोपडीत राहणारी सुदामाची बायको सुद्धा मिळेल ते रांधून घराला जेऊ घालत होती.

परिस्थितीचा फरक असेल. पण कुटुंबाला तृप्त करण्याची वृत्ती सारखीच आहे. कदाचित ही आठवण राहावी म्हणून नववधूला लग्नात माहेरून अन्नपूर्णा देतात. तिची रोज पूजा करत गृहिणीने सकस अन्न शिजवावे, नाती जपावीत, घराला घरपण द्यावे. हे सगळे करत असताना 'गृहिणी कुठे काय करते?' असा प्रश्न कोणी विचारला तर गृहिणीच्या रूपात अवतीर्ण होऊन जगाचे पोषण करणाऱ्या अन्नपूर्णेची कथा आठवावी.

या गृहिणीपणाचा उत्सव ही चैत्रगौर. रोजची देवघरातील अन्नपूर्णा मखरात हिंदोळ्यात बसविली जाते किंवा काही ठिकाणी पंचगौरचे छोटे झोपाळे पुजले जातात. त्यात मध्यभागी ही गौरी आणि सभोवताली तिचा परिवार -शिव, गणेश, नंदी वगैरे. गृहिणी हीच घराचा केंद्रबिंदू आहे, हे यातून बिंबवले जाते.

**स्वयं पश्चानन: पुत्रौ गजाननषडाननौ।**
**दिगम्बर: कथं जीवेदन्नपूर्णा न चेद्गृहे॥**

पाच मुखे असणारे शंकर; गजमुख गणेश आणि सहा मुख असणारा कार्तिकेय अशी खाणारी बारा तोंडे घरी असताना भिक्षाटन करणाऱ्या दिगंबर शिव यांचा संसार सुरळीत चालला आहे; कारण त्यांच्या घरी अन्नपूर्णा गृहिणी म्हणून आहे.

शिवांपासून तर जगभरातील सगळ्यांचे संसार ज्यांच्यामुळे सुरळीत चालले आहेत अशा गृहिणींच्या रूपात असणाऱ्या अन्नपूर्णेला नमन.

**अन्नपूर्णे सदापूर्णे शंकर: प्राणवल्लभे ।**
**ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती ।।**

## आंब्याच्या पानांचा शुभकार्यात वापर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आंब्याचे झाड या नावाचे पर्याय आहे रसाल. अर्थात ज्याप्रकारे नृत्यरसांमध्ये शृंगार रस श्रेष्ठ तसेच भोजनात मधुरस श्रेष्ठ आहे. त्याचप्रकारे झाडांमध्ये रस यादृष्टीने आंब्याचे झाड सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. कागभुषुण्डीजी हे पर्वतावर राहत होते आणि ते जेव्हा जी मानसिक पूजा करायचे तर ती पूजा आंब्याच्या झाडाखाली उभे राहूनच करायचे. या प्रकाराच्या पूजेत कोणत्याही सामुग्रीची गरज नसते. हेच कारण आहे की पाच वृक्ष पिंपळ, वड, पाकर, गूलर आणि आंबा या पाच झाडांची पाने मांगलिक अर्थात शुभकार्यांमध्ये ठेवली जातात.

त्यातूनही आंब्याची पाने सर्वश्रेष्ठ असल्याचे मानले गेले आहे. परदेशात काही ठिकाणी आंब्याची झाडे नसतात म्हणून तेथे मांगलिक कार्यांमध्ये विड्याची पाने वापरण्यात येतात. कोकिळा सुद्धा या झाडालाच आपले सहचर समजून यावर बसून आपला मधुर आवाज काढत असते. त्याचबरोबर आंब्याच्या मंजरीने कामदेवाची पूजा केली जाते.

## गौरी तीज कशी साजरी करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी ठिकाणी चैत्र महिन्यात शुक्ल पक्षात चैत्र शुक्ल तृतीयेपासून चैत्रगौर बसविली जाते. देवीला झोपाळ्यात बसवून महिनाभर म्हणजे वैशाख शुक्ल तृतीया (अक्षय तृतीया)पर्यंत तिची पूजा केली जाते. शिवपत्नी पार्वतीची ही गौरी रूपातील पूजा होय.

चैत्र महिन्यात मराठी स्त्रिया साजरा करीत असलेला हा एक पारंपरिक सोहळा आहे. स्त्रिया आपापल्या घरी हा समारंभ साजरा करतात. एका छोट्या पितळी पाळण्यामध्ये गौरीची स्थापना करतात व महिनाभरातील कोणत्याही एका दिवशी आजूबाजूच्या स्त्रियांना हळदी-कुंकवाला बोलावतात. घरी आलेल्या स्त्रिया व कुमारिका यांचे पाय धुऊन त्यांच्या हातावर व पायावर चंदनाचा लेप लावतात. भिजविलेले हरभरे आणि फळे यांनी त्यांची ओटी भरतात. तसेच कैरीचे पन्हे, कैरी घालून वाटलेली हरबऱ्याची डाळ देतात. गौरीची आरती करताना 'गौरीचे माहेर' नावाचे एक गाणे म्हणतात. ही पद्धती कोकणात मोठ्या प्रमाणात दिसून येते. घरातील मुली व स्त्रिया हळदी-कुंकू करतात त्यावेळी चैत्रगौरीपुढे शोभीवंत आरास मांडण्याची पद्धतही काही ठिकाणी दिसून येते. या महिन्यात गौरी आपल्या माहेरी येते, अशी कल्पना आहे. यानिमित्ताने महिनाभर घराच्या अंगणात चैत्रांगण काढले जाते. देवीची शस्त्रे म्हणजे शंख, चक्र, गदा, पद्म आणि तिची वाहने म्हणजे गाय, हत्ती, कासव, नाग, गरुड होत. तिची सौभाग्याची लेणी म्हणजे फणी, करंडा, आरसा, मंगळसूत्र व सुवासिनींच्या ओटीचे ताट असून दारापुढे तुळशी वृंदावन, ॐ, स्वस्तिक, आंबा, श्रीफळ, उंबर- पिंपळ वगैरे पूजनीय वृक्ष ही हिंदू संस्कृतीची प्रतीके म्हणजेच रंगीत रांगोळी भरून काढलेले चैत्रांगण होय.

चैत्रांगणामध्ये चैत्रगौरीचा पाळणा, गणपती, समई, नाभी कमळ, कासव, शंख, सूर्य, चंद्र, गोपद्म, सर्प, त्रिशूळ, स्वस्तिक, कमळ, गदा, चक्र, इत्यादी हिंदू धार्मिक तसेच नैसर्गिक आकृत्या काढल्या जातात. यामध्ये प्रत्येक महिन्यात साजऱ्या होणाऱ्या विविध सण व व्रतांचे अंकन रांगोळीच्या माध्यमातून केले जाते. मध्यभागी झोपाळ्यात बसलेल्या देवीचे चित्र, राधाकृष्ण, तुळशी अशी चित्रे चैत्रांगणात काढली जातात.



# श्री स्वामी समर्थ महाराज भगवान श्री दत्तात्रयांचे तिसरे अवतार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**"सबसे बडा गुरू.. गुरूसे बडा गुरू का ध्यास.. और उससे बडे श्री स्वामी समर्थ महाराज..."**


इ. स.१४५७ च्या सुमारास श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांनी गाणगापुरात निर्गुण पादुका स्थापन केल्या. त्यानंतर शैलयात्रेचे साधून ते कर्दळी वनात अदृश्य झाले. या कर्दळी वनात सुमारे ३०० वर्षे महाराजांनी कठोर तपश्चर्या केली. या काळात मुंग्यांनी त्यांच्यावर वारूळ निर्माण केले. एके दिवशी उद्धव नावाचा लाकूडतोड्या त्याच कर्दळी वनात लाकडे तोडीत असताना त्याच्या हातून कुऱ्हाड निसटली व ती वारूळावर पडली. ही स्वामी महाराजांची लीलाच की त्या उद्धवाचे निमित्य साधून त्यांना पुन्हा भक्तांच्या कल्याणासाठी प्रगट व्हायचे होते. कुऱ्हाड वारूळावर पडताच त्यातून रक्ताची धार उडाली व क्षणातच दिव्य प्रकाश पडून उद्धवासमोर एक अजानबाहू तेजस्वी मूर्ती प्रकट झाली तेच अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ महाराज.

आपल्या हातून या महापुरुषाला जखम झाली या विचाराने उद्धवाला दुःख झाले व भय वाटू लागले. पण भक्तांसाठी माताच असलेल्या महाराजांनी उद्धवाला अभय व आशीर्वाद देऊन गंगातीरावर प्रयाण केले. गंगातीरावर भ्रमण करता- करता ते कोलकत्यास गेले व तेथे त्यांनी महाकाली मातेचे दर्शन घेतले. नंतर काशी, प्रयाग असे भ्रमण करीत ते उत्तरेकडून दक्षिणेस आले. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे त्यांनी शेगावचे श्री गजानन महाराज व शिर्डीचे श्री साई महाराज यांना दीक्षा दिली. त्यानंतर स्वामी पंढरपूर, मोहळ असे भ्रमण करीत सोलापुरात आले. त्यानंतर मंगळवेढे नामक गावास स्वामींनी काही काळ वास्तव्य केले व तेथील भक्तांना विविध स्तरावर मार्गदर्शन केले. भेटेल त्याला आपल्या लीलेने आगळ्यावेगळ्या पद्धतींनी दुःखमुक्त करून कार्यरत केले.

इसवी सन १८५६ मध्ये श्री स्वामी महाराजांनी अक्कलकोट येथे प्रवेश केला. तेथील बावीस वर्षांच्या वास्तव्यात सर्व विश्वाला देदीप्यमान असे तीर्थक्षेत्र अक्कलकोट करून जगातील अनेक मान्यवरांना मार्गदर्शन केले. इसवी सन १८७८ मध्ये स्वामींनी अनेकांना कार्य करून त्यांचा एक आविष्कार संपविला, असे भासवले. परंतु प्रत्यक्षात स्वामी महाराज आज देखील भक्तांच्या पाठीशी सतत राहून त्यांना मार्गदर्शन करून कार्यरत करीत आहेत व अनंतकाळापर्यंत करीत राहतील.

श्री स्वामी समर्थ हे श्री दत्त महाराजांचा पूर्ण ब्रह्मस्वरूप तिसरा अवतार आहे. भक्तांनी त्यांना ज्या दृष्टीने पाहिले त्या स्वरूपात त्यांनी दर्शन दिले आहे. कोणाला श्री विठूमाऊलींच्या रूपात त्यांचे दर्शन घडले, तर कुणाला श्री भगवान विष्णूंच्या स्वरूपात तर कुणाला भगवती देवीच्या रूपात महाराजांनी भक्तांच्या कल्याणासाठी अनेक लीला दाखविल्या.

अनन्यभावाने भक्ती करणाऱ्या भक्तांच्या सदैव पाठीशी राहून त्यांचा योगक्षेम चालविण्यासोबतच ''भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे,' असे अभिवचन देणाऱ्या श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन नुकताच सर्वत्र भक्तीमय वातावरणात साजरा झाला. पुढील सर्व आयुष्य त्यांच्याच चरणी कार्यरत होत जावे, हीच श्री स्वामींच्या चरणी प्रार्थना.



### स्वामींबद्दलची महती

अक्कलकोट हे श्री स्वामी समर्थ महाराजांचे प्रसिद्ध स्थान आहे. जेथे ते बराच काळ वास्तव्यास होते. ते भगवान दत्तात्रय यांचे तिसरे पूर्णावतार मानले जातात. त्यांचा कार्यकाळ इ.स. १८५६ ते १८७८ दरम्यान होता.

-त्यांचे मूळ
स्थान : अक्कलकोट, जि. सोलापूर (महाराष्ट्र).
अवतार : श्रीपाद वल्लभ आणि श्री नृसिंह सरस्वती यांच्यानंतरचे भगवान श्री दत्तात्रयांचे तिसरे पूर्णावतार.
कार्यकाळ : इ.स. १८५६ ते १८७८.
अक्कलकोटमधील वास्तव्य :
स्वामी समर्थ सुमारे २२ वर्षे अक्कलकोट येथे वास्तव्यास होते.
प्रकट दिन : स्वामी समर्थांचा प्रकट दिन चैत्र शुक्ल द्वितीया आहे.
अक्कलकोटचे महत्त्व : अक्कलकोट हे स्वामी समर्थांच्या भक्तांसाठी एक पवित्र स्थान आहे, जेथे ते ध्यान आणि उपदेश करायचे.
समाधी : स्वामी समर्थांनी १८७८ मध्ये समाधी घेतली.
इतर नावे : काही ठिकाणी त्यांना 'चंचल भारती' आणि 'दिगंबर स्वामी' म्हणूनही ओळखले जाते.
गाणगापूरचे स्वामी : गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्री स्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले, अशी मान्यता आहे.

**अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगिराज परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय.**

# गुढीपाडव्याला श्रीखंडच का खावे?

## आयुर्वेद आणि श्रीखंड यांचा काय आहे नेमका संबंध?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी वर्षाची सुरूवात चैत्र महिन्यात गुढीपाडव्याच्या दिवसाने होते. हिंदू कालदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला म्हणजेच वसंत ऋतूच्या पहिल्या दिवसाला गुढीपाडवा साजरा केला जातो.

या दिवशी घरोघरी बांबू, रेशमी वस्त्र, तांब्या, आंब्याची डहाळी, कडुनिंबाची कोवळी पाने, बत्ताशाची माळ यासारख्या शंभर टक्के नैसर्गिक आणि आरोग्यास पूरक असलेल्या गोष्टी वापरून गुढी उभारून त्याची पूजा केली जाते. बत्ताशाचा प्रसाद वाटला जातो आणि कडुनिंबाची चटणी खाल्ली जाते.

असे म्हटले जाते, की जी गोष्ट पूर्ण वर्षभर करायची असेल ती वर्षाच्या पहिल्या दिवशी नक्कीच करावी. म्हणूनच काय ते गुढीपाडव्याच्या दिवशी आहारात आपण गोडपासून ते कडूपर्यंत सर्व चवींचा समावेश केलेला असतो.

या दिवशी गुढीला श्रीखंड- पुरीचा नैवेद्य आवर्जून दाखविला जातो. आपण या श्रीखंडाबद्दल थोडे जाणून घेऊया.

आयुर्वेदात श्रीखंडाला 'रसाला' किंवा 'शिखरिणी' म्हणतात.



श्रीखंड या पदार्थाला पौराणिक संबंध सुद्धा आहे. महाभारतामधील भीम जेव्हा 'बल्लव' या नावाने स्वयंपाक करीत होता तेव्हा हा खाद्यपदार्थ सर्वप्रथम तयार केला. या पदार्थांच्या सेवनामुळे श्रीकृष्णाला झोप आली. श्रीच्या दैनंदिन व्यवहारात यामुळे खंड पडला, म्हणूनच हा पदार्थ श्रीखंड म्हणून ओळखला जातो.

### आता गुढी पाडव्याला श्रीखंडच का खायचे?

उन्हाळ्यातील उष्णतेचा सामना करताना थकवा येऊ नये, शरीरशक्ती टिकून राहावी यासाठी श्रीखंड हे रसायनाप्रमाणे काम करते. म्हणजेच काय तर उन्हाळ्यात कडक उन्हामुळे ज्याचे शरीर अगदी शुष्क बनले आहे, ज्यांना उत्साह नाही, ज्यांना शरीराची पुष्टी हवी असेल त्यांना श्रीखंड हे अगदी उत्तम होय.

श्रीखंड हे पचायला थोडे जड असते, शिवाय हा थोडा आंबवलेला पदार्थ आहे. यादृष्टीने आयुर्वेदाने श्रीखंडाला लागणारे घटक व ते बनविण्याची कृती व्यवस्थित सांगून ठेवली आहे. पण आजकाल बरेच जण आयुर्वेदिक विधी न वापरता श्रीखंड बनवितात. यामुळे श्रीखंड बाधते.

### आयुर्वेदानुसार श्रीखंड कसे बनवावे?

प्रथम छान दही लावावे. ते कधीही आंबट असू नये. चांगले दही लागल्यानंतर सूती अथवा तलम वस्त्रात बांधून पुरचुंडी तयार करून ते ७-८ तासांसाठी टांगून ठेवावे. जे काही जलरहित दही तयार झाले आहे त्याला आपण चक्का म्हणतो.

आयुर्वेदिक श्रीखंडामध्ये चक्का हा खडीसाखर (मिक्सरला बारीक करून घेणे) बरोबर फेटायचा आणि फेटायच्या भांड्याला कापराने धुपवले जाते आणि श्रीखंड पचविण्यासाठी लागणारा अग्नी मधरूपाने समाविष्ट असतो. श्रीखंडाच्या अन्नशुद्धीसाठी त्यात तूपही टाकलेले असते.

नंतर त्यात दालचिनी, नागकेशर, वेलची, मिरी पावडर, तमालपत्र, सुंठ याची पावडर करून मिसळली जाते. वरून थोडे केशरी दूध घालावे म्हणजे तुमचे आयुर्वेदिक श्रीखंड तयार होते.

वरील विधीवरून हे लक्षात येते, की श्रीखंड जरी कफ वाढविणारे असले, तरी त्याबरोबरीने अशा पदार्थांची योजना केलेली आहे. त्यामुळे श्रीखंड कफवर्धक ठरत नाही.

थोडक्यात काय तर गुढीपाडव्याच्या परंपरेचा आरोग्य अर्थ जाणून घेऊन हा सण साजरा केला पाहिजे. म्हणजे येणारे नवीन वर्ष सुख, समृद्धीने युक्त आणि आरोग्याने परिपूर्ण नक्कीच होईल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)